**नियमित दिवाणी दावा क्र.२१२/२०२३**

(धनाजी वि. मारुती व इतर)

**CNR No.MHSO07-000251-2023**

**<u>निशाणी क्र.३० खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ ते ६ व ८ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करणेस परवानगी मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या कथनानुसार, त्यांना मिळकतीबाबतची जुनी कागदपत्रे मुदतीत मिळाली नाहीत. तसेच ते आजारपणाने त्रस्त होते. त्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आले नाही. सदरचा वाद हा स्थावर मिळकतीचा असून त्यांचे देखील हितसंबंध गुंतलेले आहेत. सबब, त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींच्या विनंतीनुसार कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ न केल्यास आणि त्यांना त्यांचे कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये ३००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.३ ते ६ व ८ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावी. |
| ३. | प्रतिवादी क्र.३ ते ६ व ८ यांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले कैफियत अभिलेखावर घेण्यात यावे. |

PRIYANKA NAMADEV PATHADE

Digitally signed by PRIYANKA NAMADEV PATHADE
Date: 2024.03.19 18:02:33 +0530

(पा. एन. पठाडे)

दिनांकः– १९.०३.२०२४ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

# Certificate

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 19.03.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 19.03.2024 |
| Judgment/Order uploaded on | - | 19.03.2024 |